## : प्रकरण ३ रे :

# म. भा. भोसले यांच्या कथेचा आशय : अभिव्यक्तिदृष्ट्या विचार

मराठी ग्रामीण कथा विशिष्ट प्रदेशाचे भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक चित्रण करणारी कथा ठरते. तिच्यातून शहरी जीवनापेक्षा वेगळ्या असलेल्या ग्रामीण जीवनाचा आलेख आपणासमोर मांडावा असा लेखकाचा अट्टाहास असतो. तो आपणास म. भा. भोसले यांच्या लेखनातून दिसून येतो. ग्रामीण परिसरातील कथेला अनुरूप असणारे सर्व विशेष त्यांच्या कथेतून दिसून येतात. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात खेड्यातील मध्यमवर्गीय माणसाविषयी, त्यांच्या जीवनाविषयी अत्यंत भावनिकतेने त्यांनी लिहिले.

मराठी ग्रामीण कथेत म. भा. भोसले यांच्या कथेचे स्थान मोठे दुय्यम स्वरूपाचे असले तरी त्या ग्रामीण मातीवर, त्या परिसरावर प्रेम करुन त्यांनी ते टिकविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे-

मध्यमवर्गीय माणसाच्या सुखदुःखाला भोसले यांची कथा प्राधान्य देते. त्यांनी स्वत: शेतकरी, कामकरी, मजूर यांचे जीवन जवळून पाहिले, अनुभवले आणि त्यांच्या सुखदुःखाशी ते एकरूप झाले. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत त्यांनी तीव्र दुःख व्यक्त केले.

खेड्यातील माणसांची सुखदुःखे, त्यांच्या समस्या याचे चित्रण करताना ग्रामीण पार्श्वभूमीवर अतिरंजित, अवास्तव घटना रंगवून सांगणे हे त्यांनी अदिष्ट मानले आहे. त्यांच्या कथेचे स्वरुप घटना प्रधान आहे. जीवनात अनुभवास येणारा एखादा प्रसंग ते सरळ स्वीकारतात आणि त्याला रंगवून ते कथेचे रूप देतात. म्हणजे खेड्यातल्या जीवनावर प्रकाश टाकण्याचे महत्त्वपुर्ण कार्य त्यांची कथा करते. कथा साकार करताना पार्श्वभूमीला, प्रत्यक्ष वर्णनाला ते प्राधान्य देतात. कारण वाचकांच्या मनाची पकड घ्यायला ज्या गोष्टीची आवश्यकता असते ते प्रत्यक्ष वर्णनपद्धतीतून ते साकार करतात.

ग्रामीण पार्श्वभूमीवर असणारा प्रेमाचा त्रिकोण प्रत्यक्ष वर्णन पद्धतीतून योग्य त्या रीतीने साकार होतो, तेव्हा खेड्यातील हे चित्रण व्यक्तीचे लक्ष आकर्षित करून घेते. त्यामुळे खेडी व शहरे यातील अंतर जाणवू लागते. खेड्यातील जीवनाचे आकर्षण हे रोमॅन्टिक कुतूहल शहरी पांढरपेशीय मनाला जाणवू लागते. खेड्यातल्या समाजजीवनाचे चित्रण करताना मनातील भावनांची, विचारांची अनंत वर्तुळे त्यांना

निर्माण केली व त्या साऱ्यांना त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले. मानवी जीवन जगण्याची तीव्र इच्छा, ओढ या गोष्टी त्यांच्या कथेला जवळच्या ठरतात व त्याच्या आधारावरच ती कथा साकार होत जाते.

**✳ म. भा. भोसले यांच्या कथेत आशय :-**

**✳ ग्रामीण शेतकरी जीवनाचे चित्रण :-**

म. भा. भोसले यांचा पिंड ग्रामीण भागातच घडत गेल्याने त्यांना त्या जीवनाविषयी आकर्षण आहे. याची पूर्ण जाणीव त्यांच्या कथा आशयावरून स्पष्ट होते. ग्रामीण चित्रण रेखाटण्याची त्यांची हौस मोठी आहे. शहरी पांढरपेशी जीवनापेक्षा भिन्न, वेगळे असे वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण जीवन त्यांनी कथेतून साकार केले त्यामुळे कथा विषयात ग्रामीण जीवनाला अग्रक्रम द्यायला ते कारणीभूत होतात.

'शिवना परीट' या कथेतून त्यांनी अस्सल ग्रामीण शेतकरी वर्गाच्या जीवनाचे चित्रण केले. खेड्यात राहून त्या मातीशी एकरूप होणारा व तिच्यावर उत्कट प्रेम करणारा शेतकरी पिढ्यानपिढ्या उपेक्षित आहे. दुसऱ्यावर परोपकार करणे ही त्याची अंगवृत्ती आहे. या कथेतला नायक सावकाराविरुद्ध पेटून उठतो. मिळालेला हक्क तो सोडायला तयार नाही. पण मुळात तो माणूसकी जपणारा व मानवतेची पूजा करणारा आहे. पिढ्यानपिढ्या श्रीमंतीत वावरणाऱ्या सावकाराला तो दुष्काळाच्या महान संकटातून वाचवितो. तेव्हा त्यांने दिलेली दोन एकर जमीन सावकार परत मागतो तेव्हा शिवना पेटून उठला असला तरी माणूसकी जपतो. त्याची जमीन परत देण्याचा विचार शिवनाच्या मनात येतो.

'अहेव लेणं', 'खिल्लारी जोडी' या कथा ग्रामीण जीवनाला अगदी जवळच्या ठरतात. 'अहेव लेणं' ही कथा तर शेतकरी वर्गातल्या एका कौटुंबिक प्रेमाचे चित्रण साकार करते. शेतकरी आपल्या बायकोवर, मुलावर जितका प्रेम करतो तितकाच तो आपल्या शेतावर प्रेम करतो व समाजात आपली मान उंचावतो. पण स्वत:च्या आयुष्याचा शेवट होऊ लागतो तेव्हा आयुष्यात आलेल्या एका प्रसंगाने त्याचे मन दु:खी होते. त्याचा जीव त्याच्यात अडकून पडतो. ग्रामीण जीवनाचे प्रभावी चित्रण करणारी ही कथा आहे.

मुक्या प्राण्याच्या प्रेमाला वाचा फोडणारी 'खिल्लारी जोडी' ही अस्सल ग्रामीण कथा आहे. ग्रामीण जीवनातील वास्तवाला प्राधान्य देणारी ही कथा आहे.

'महापूर' ही कथा ग्रामीण परिसरात अनेक प्रसंगाना सामोरे जाऊन माणूस आपले जीवन कसे जगतो हे दाखवून देते. ग्रामीण भागात ज्यावेळी असंख्य प्रश्न निर्माण होतात त्यावेळी मारामाऱ्या, हवेदावे, अनेक भानगडी या गोष्टींना उत येतो पण शेवटी माणूसकी ही सर्वश्रेष्ठ ठरते. स्वत:.चा जीव धोक्यात घालून दुसऱ्याचा जीव वाचविला जातो. 'जिवंत पोरं', 'भागीदारीण', 'नांदाय जाते', 'बिनचवीचा घास', 'तुळसा' या सारख्या कथेतून ग्रामीण जीवनाचे चित्रण प्रभावीपणे केले गेले आहे. जीवनात शेतकऱ्याला परिस्थितीशी झुंज देताना बलाढ्य शक्तीशी झुंज द्यावी लागते आणि प्रसंगावधान राखून त्यातून बाहरे पडावे लागते. हे करताना तो माणूसकी जपतो.

बऱ्याच वेळा ग्रामीण परिसरात लग्नासारखा वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग घडतो तेव्हा तेथेही वावरताना ग्रामीण माणूस माणूसकीने वागतो, तर ग्रामीण परिसरातल्या तरूणाला आपण केलेल्या दुष्कृत्याची लाज वाटते हे सारे ग्रामीण जीवनाला जवळचे ठरणारे चित्रण म. भा. भोसले यांच्या कथेतून प्रभावीपणे पहावयास मिळते.

**✳ दारिद्र्याचे वास्तव चित्रण :-**

ग्रामीण परिसरातील शेतकऱ्याच्या वाट्याला येणारा महत्त्वाचा प्रश्न दारिद्र्य हा आहे. पिढ्यानपिढ्या आपले जीवन दु:खात, दारिद्र्यात तो जगत असतो. भोसले यांच्या कथेतूनही दारिद्र्याचे प्रभावी चित्रण केले गेले आहे.

ग्रामीण परिसरात दिलदार व उदार मनाचा शेतकरी वावरतो. शेतकऱ्याचे दु:ख शेतकऱ्यालाच समजते. 'बळीराजा' या कथेत दुष्काळात आपल्या जवळचे सर्व धान्य संपते तेव्हा बाबू पूर्णपणे दरिद्री बनलेला असतो. परिस्थितीशी सामना करण्यासाठी तो बलुतेदाराकडून दीडपट वाढीने धान्य घेतो. आपल्या वाढत्या कुटुंबाची झालेली दयनीय अवस्था पाहून त्याला भूक लागत नाही. आता आपले कसे होणार या विवंचनेत असणारा या कथेचा नायक बाबू हैराण होतो. धान्याची दुर्मिळता आणि प्रचंड महागाई या स्थितीत गाफिल राहिलो तर अन्न अन्न करून आपण मरणार असे त्याला वाटते. पण धोंडिबा न्हाव्याचे मदतीने त्या प्रसंगातून तो निभावतो. पण पुढे बलुतेदारांना जगावे कसे असा प्रश्न पडतो

तेव्हा धोंडीबा न्हावी बाबूकडे धान्याच्या अपेक्षेने येतो, तेव्हा बाबू माणूसकीच्या भावनेतून त्याला मदत करतो पण शेतकऱ्याच्या व बलुतेदाराच्या दु:खाला व दारिद्र्याला सीमा असत नाही.

'गोकीचे गोकूळ' या कथेत अस्पृश्य समाजात जन्माला येऊनही दारिद्र्याची पीडा सहन करावी लागणारे कुटुंब प्रत्ययास येते. तर 'मुका मार' या कथेत दारिद्र्य अस्पृश्य समाजाच्या पाचवीला पुजलेले असते हे दाखविले आहे. नोकरी करून पोट भरणाऱ्याच्या ही वाट्याला हे दारिद्र्य येते. एका शाळेत शिक्षकाचे काम करणाऱ्या कांबळे मास्तराला पोटा पुरते अन्न मिळत नाही. पोटाची आग त्याला लाचार बनविते व अपमान नि अवहेलना त्याला सहन करावी लागते. शाळेत एका शिक्षकाने दिलेल्या जेवणाच्या पंगतीत त्याला वेगळ्या अर्थाने प्रवेश मिळतो. पण दारिद्र्याची आग त्याला सहन करता येत नाही. आपली मुले त्याच्या डोळ्यासमोर नाचू लागतात. पुढे उकिरड्यावर फेकले गेलेले अन्न तो गोळा करतो पण तेही त्याच्या हातातून हिरावून घेतले जाते.

'बिनचवीचा घास' या कथेत तर काबाडकष्ट करून स्वत:चे जीवन जगणाऱ्या कुटुंबाचे चित्रण येते. दुसऱ्याच्या शेतावर राबून पोट भरणे व प्रामाणिकपणे जगणे ह्या कथेतल्या व्यक्तींच्या जीवनाचा महत्वाचा भाग आहे. पण गुंडांच्या कडून पुन्हा लुबाडले जाऊन पुन्हा दारिद्र्यात खितपत पडणे हेही त्यांच्या वाट्याला येणारे असते. अशा या दुर्दैवी जीवांची कहाणी या कथेतून साकार झाली आहे.

### ✳ भाऊबंदकीचे चित्रण :-

ग्रामीण परिसरात अनेक प्रसंगाना सामोरे जाऊन जगणारा माणूस आढळतो. अनेक प्रश्न खेड्यात उद्‌भवतात. स्वत:चे कर्तृत्व, बडेजाव, संघर्ष, मारामाऱ्या, हेवेदावे, अनेक भानगडी, भेदाभेद, जातियता यांना ऊत आलेला असतो.

'महापूर' या कथेत त्याचे चित्रण प्रभावीपणे आले आहे. गावात कूळ म्हणून वावरणारे शिंदे, जाधव, मोरे, आणि पाटील यांच्यातल्या संघर्षाला म. भा. भोसले यांनी वाचा फोडली आहे. पण तो संघर्ष मिटविण्यासाठी शिवा पाटलाच्या मुली बरोबर शिंद्यांचा मुलगा राम यांच्या लग्नाचा घाट घातला

गेला. तेव्हा शिवा पाटलाची भावकी त्याच्यावर बिथरलेली दिसते. कारण ''कूळ म्हणून वावरणाऱ्याच्या घरात आपली मुलगी द्यावयाची असेल तर आम्हाला लग्नात यायचे नाही''[१] हे त्यांनी स्पष्ट सांगून टाकले.

या भाऊबंदकीच्या चित्रणात अनेक प्रसंग येतात. एकमेकांच्यात संघर्ष येतो. खेड्यातल्या वातावरणात या गोष्टी जवळून पाहता येतात. अनेक प्रश्न या माणसांच्या समोर उभे असतात आणि त्यांच्यात चाललेला वाद शिगेला पोहचलेला असतो. याचे प्रभावीपणे चित्रण भोसले यांच्या ग्रामीण कथेत येते.

**✳ अस्पृश्यता : -**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रेस सरकारने जातीयता नष्ट करण्यासाठी ज्या घोषणा केल्या त्याचा परिणाम समाजावर कितपत झाला व त्याला यश कितपत मिळाले. यावर म. भा. भोसले यांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे. पिढ्यानपिढ्या ज्यांच्या वाट्याला गावकुसाबाहेरचे जीवन आले आहे अशा माणसांचे जीवन इतरांच्या पेक्षा काहीतरी वेगळे असते व समाज त्यांच्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहतो. या अस्पृश्य म्हणून ओळखलेल्या माणसांचे चित्रण म. भा. भोसले यांच्या कथेतून चित्रित झाले आहे.

'गोकीचे गोकूळ' या कथेतला अस्पृश्य समाजातील तरूण मास्तर शहरातील शाळेत असताना त्याच्या आडवी जात येत नाही. सर्वसामान्य माणसाबरोबर त्याला वावरता येते पण ज्यावेळी तो खेड्यातील शाळेत जातो तेव्हा त्याच्या विकासाच्या, राहणीमानाच्या आड जात येते. पिढ्यानपिढ्या या समाजात जातीयतेची मुळे खोलवर कशी रूजली आहेत. जातीयता नष्ट करा हा सरकारने केलेला कायदा तिथे पोकळ ठरला आहे आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना असाहयतेचे जीवन कसे जगावे लागले आहे याची जाणीव या कथेद्वारे करून दिली आहे.

गावात राहण्यासाठी व जेवण्यासाठी जागा मिळत नाही उलट अपमानास्पद बोलून घ्यावे लागते. गावातल्या एका हॉटेलात मळकट पेल्यातून चहा दिला जातो आणि शेवटी महारवाड्यातच राहायला जागा मिळते. महार म्हणजे उकीरडा या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले जाते. तेव्हा काँग्रेस सरकारने अस्पृश्यता नाहीसी करण्याचा कायदा केला आणि त्यातही खोच मारली की अस्पृश्यता सार्वजनिक

ठिकाणी मानली जाऊ नये. कायदा करणारे सरकार मुंबईत आहे. कायद्याप्रमाणे जाणणारे लोक शहरात आहेत तर खेड्यात तो कायदा जाणणारे लोक नाहीत व तो मोडणाऱ्यांना पकडणारे पोलिसही नाहीत मग अस्पृश्यता कशी नष्ट होणार ? असा प्रश्न भोसले यांना पडला आहे.

खेड्यात पिढ्यानपिढ्या जातीयतेच्या नावाखाली अस्पृश्य समाजाचा छळ केला जातो. समाजात काहीतरी करण्याची धडपड असणाऱ्या अस्पृश्य वर्गाला त्याचा त्रास होतो पण तरीही तो तिथे राहतो आणि आपल्या भावी संसाराची मुहूर्तमेढ रोवतो.

'मुका मार' ही कथा तर ग्रामीण परिसरातील अस्पृश्यता या घटकाची पूरेपूर जाणीव करून देणारी कथा आहे. अस्पृश्य शिक्षकाच्या मनातील तगमग व्यक्त करणारी ही कथा आहे. दारिद्र्य हे अस्पृश्यांच्या पाचवीला पुजलेले असते. नोकरी करून जीवन जगताना या दारिद्र्याची पिडा किती तीव्र स्वरुपात सहन करावी लागते, शाळेत एका शिक्षकाने मुलगा झाला म्हणून दिलेल्या लाडूपूरीच्या जेवणात त्याला दूर बसावे लागते. ब्राह्मण, मराठा, मुसलमान, जैन हे एकत्र पंगतीला बसलेले असताना त्याला तिथे बसता येत नाही. आपणा स्वत:साठी कोपऱ्यात वेगळ्या मांडलेल्या पाटावर त्याला बसावे लागते. श्रीखंड घेताना तिथे कल्हई केलेली वाटी त्याला मिळत नाही. तेव्हा त्याला त्या परिस्थितीतच जेवण करावे लागते. अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून महाराष्ट्रात उठलेल्या सहभोजनाची त्याला आठवण होते.

आपण अस्पृश्य असलो तरी आपणास सहन करावे लागणारे हे जीवन किती किळसवाणे आहे याची जाणीव त्याला होते. उकिरड्यावर पडलेले खरकटे इच्छा असूनही त्याला घेता येत नाही. आपल्या मुलांच्यासाठी त्या पक्वान्नाचा मोह त्याला आवरता येत नाही पण त्या अशिक्षित अस्पृश्यांना पहिल्यानंतर त्याला तो मोह आवरावा लागतो. आपल्या हातातील पान त्यांना टाकावे लागते. आज त्या अस्पृश्यांच्या मुलांची चंगळ होणार आणि आपण सुशिक्षित अस्पृश्य असल्याने आपली मुले उपाशी राहणार म्हणून शिक्षणाने मनाची सुधारणा झाली तरी पोटाची खळगी भरत नाहीत असेही त्याला वाटून जाते.

अस्पृश्य समाजाच्या वाट्याला जातीयतेच्या नावाखाली जे सहन करावे लागते व त्यांच्या वाट्याला येणारी एवढी भयानक अवस्था कुठही असणार नाही. शिक्षणामुळे अस्पृश्यता नष्ट होईल हा

सर्वसामान्य लोकांचा समज येथे पूर्णपणे चुकीचा ठरतो. तिथंही त्यांला परंपरेने चालत आलेली वागणूक मिळते. एका सुशिक्षित अस्पृश्याच्या जीवनाची अवस्था किती हालाकीची झाली आहे याचे प्रभावी चित्रण म. भा. भोसले या कथेतून करतात.

'भाकरी शपथं खरं' या कथेत अस्पृश्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिरूला पोट भरता येत नाही, त्याला काम मिळत नाही तेव्हा पडेल तो व्यवसाय करून, खोटे बोलून, प्रसंगी बेरकीपणाने वागून तो पोट भरत असतो.

अशी ही अस्पृश्यता पिढ्यानपिढ्या या समाजात एवढी रूजली गेली आहे की ती नष्ट होऊ शकत नाही. या समाजातल्या विशिष्ट वर्गाला त्याचे गंभीर परिणाम सोसावे लागतात याचे प्रत्यंतर भोसले यांच्या कथेतून येते.

**✳ मुक्या प्राण्यावरील प्रेम :-**

ग्रामीण कथेत मुक्या प्राण्यावर प्रेम करणाऱ्या प्रसंगाचे चित्रण बऱ्याच प्रमाणात झालेले दिसून येते. शेतकरी स्वत:च्या प्राणापेक्षा मुक्या प्राण्याला जास्त जपतो. त्याचे आणि त्या प्राण्याचे पारंपारिक नाते असते. त्या प्राण्याला तो जीव लावतो, प्रसंगी त्या प्राण्याच्या प्रामाणिकपणाविषयी त्याला अभिमान वाटतो.पण त्या प्राण्याचा शेवट झाल्याने त्याला आतोनात दु:ख होते.

म. भा. भोसले यांची 'खिल्लारी जोडी' ही कथा एका वास्तव प्रसंगावर आधारलेली आहे. गावातील सावकाराची पैज जिंकण्यासाठी पंचवीस खंडी वजनाची लाकडाची वीट हंबीर साळुंख्याचे पठाण आणि धुमाळ हे बैल ओढ्यातील गाळातून ओढून आणतात. त्या बैलावर जिवापाड प्रेम करणारा हंबीर खिल्लारी बैलांच्या नादाने पठाण व धुमाळ या बैलांना विकतो. पण प्रचंड ताकदीचे पठाण व धुमाळ जे काम करतात ते काम नवीन खिल्लारी जोडी करू शकत नाही हे त्याच्या लक्षात येते. पुढे पठाण व धुमाळ खडकीच्या कत्तलखान्यात गेलेली त्याला समजतात तेव्हा त्याला अतिशय दु:ख होते.

या ग्रामीण मातीत जनावरावर जिवापाड प्रेम करणारा, स्वत:च्या बैलांच्या ताकतीचा अभिमान असणारा, स्वत:च्या मस्त धुंदीत जगणाऱ्या हंबीर सारख्या शेतकऱ्याला पश्चातापाशिवाय पर्याय

राहात नाही. ज्यांनी मानसन्मान मिळवून दिला त्यांना आपण विकले याचे त्याला दुःख होते. त्यांना परत आणण्याचे विचारही त्याच्या मनात येतात पण ती परत येऊ शकत नाहीत. अशी चूक आपण पुन्हा करणार नाही अशी कबुली देऊन जिद्दीने व जोमाने त्या बैलांच्या वासरांना मोठे करण्यासाठी तो पुढे सरसावतो.

कथा वाङ्मय प्रकारात ग्रामीण परिसरातील विविध घटनांचे तपशीलवार निवेदन केले जाते. एखादा प्रसंग सादर केला जातो तेव्हा तिथे असणारा प्राणी त्याला उपयोगी पडतो. शेतकऱ्याला उपयोगी पडणाऱ्या प्राण्यांची ग्रामीण कथेत घेतली गेलेली दखल महत्त्वपूर्ण आहे. मुकाप्राणी त्यांच्या साऱ्या जीवनाला उपयोगी पडतो त्यामुळे त्याच्यावर त्याचे जिवापाड प्रेम असते.

**✳ संघर्षमय जीवन :-**

जीवनात संघर्ष हा ठरलेला असतो. त्याचा प्रत्यय वारंवार त्या व्यक्तीला येत असतो. या संघर्षमय जीवनाचे चित्रण ग्रामीण कथेत झालेले आढळते. म. भा. भोसले यांनी परिसरातल्या संघर्षाला एक वेगळीच दिशा दिली आहे.

'महापूर' या कथेत कूळ म्हणून वावरणाऱ्या शिंदे, जाधव, मोरे विरुद्ध पाटील हा संघर्ष स्वत:चे असणारे गावातील स्थान दाखवून देतो. स्वत:ची प्रतिभा किती श्रेष्ठ हा त्या पाठिमागील उद्देश असतो. तोच या कथेत साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. लग्नसराई किंवा बेंदूर हा भांडणाला ऊत येण्याचा काळ, एकमेकांच्या विरुद्ध नको तेवढ्या कुरघोड्या करणे हा त्या ग्रामीण परिसरातल्या माणसाचा स्वभावच आहे.

या कथेतल्या दोन्ही बाजूच्या लोकांची सतत जुगलबंदी ठरलेली असते. पाटलांच्या कोंबड्या उकिरडे उकरत म्हणून शिंद्यांची पोरे त्यांना टिपतात तर शिंद्यांच्या शेरड्यां परड्यात येऊ नयेत म्हणून पाटील घराभोवती कुंपण घालतात. अशा या कारणावरुन सतत भांडणे होत. त्यांच्यातला संघर्ष शिगेला पोहचे आणि प्रकरण कोर्टात जाई.

बेंदराला बैलांची मिरवणूक निघाली की यानी सनई आणली तर त्यानी बँड आणायचा. यानी तमाशा सांगितला तर त्यानी जलसा आणायचा आणि मग यातच कमी जास्त होऊन डोकी फुटायची.

13595

लग्नसराईत तर दोन्ही कडून वराती यायच्या आणि मग मारूतीचं दर्शन आधी कुणी घ्यायचे ? यावरुन बाचाबाची व्हायची. हा सारा संघर्षमय जीवनाचा पसारा खेड्यात मांडलेला असतो. याचे योग्य ते दर्शन भोसले यांनी आपल्या कथेतून रंगविले आहे.

'शिवना परीट' या कथेत सावकाराशी संघर्ष करायला निघालेला शिवना दिसतो. शेतात राबून काबाडकष्ट करणारा पण आपला हक्क हिराऊन घेतला जातो तेव्हा पेटून उठणारा आणि प्रसंगी सावकारालाही आव्हान देऊन त्याचा सूड घ्यायला तो शेतात जातो. पण पुढे त्याची हार झालेली दिसून येते. या साऱ्या संघर्षमय जीवनाचे चित्रण भोसले यांनी ताकदीनिशी केले आहे.

'माझा सुताडाच बरा'या कथेत शिकलेल्या पिढीचा संकुचितपणा दाखवून दिला आहे. या कथेतल्या ममताला दीर व जाऊ यांना दूर ठेऊन राहावे असे वाटते. आपण आयुष्यभर कष्ट करतो आणि मास्तर मास्तरीण आपल्याकडे तुच्छतेने पाहून मनात हसतात असे तिला वाटते त्यामुळे सुट्टी दिवशी आपण त्यांच्याप्रमाणे फक्त माडीवर बसून राहावे व आपण दररोज जी कामे करतो ती त्यांनी करावी असे तिला वाटते. इथेच त्यांच्यातील संघर्षाला वाचा फुटते. पण पुढे घरातील जुना वर्ग पड खाऊन मोठ्या मनाने पूर्वीचे जीवन स्वीकारतो. नव्या वर्गाशी तो जमवून घेण्याचा प्रयत्न करतो.

या संघर्षमय जीवनाचे चित्रण म. भा. भोसले यांनी आपल्या कथेतून प्रभावीपणे केले आहे. ग्रामीण परिसरात संघर्ष हा ठरलेलाच असतो आणि त्याचे प्रत्यंतर त्यांच्या कथेतून येते.

**✳ दुःखाच्या असह्य वेदना :-**

माणूस दुसऱ्यासाठी त्याग करतो तेव्हा आपण ज्याच्यासाठी काहीतरी करतो त्यांच्या जीवनाचे कल्याण व्हावे. समाजात त्याला मान मिळावा असे त्याला वाटते.

'माझी ताई' या कथेत भोसले यांनी पत्रलेखन पद्धती वापरुन खेड्यापासून दूर शिक्षणासाठी राहिलेला भाऊ आणि नोकरी करून त्याला पैसे पुरवणारी बहिण यांच्यातल्या बहिणभाऊ प्रेमाची कहाणी सांगितली आहे. पण हे सर्व भूपालसाठी करून स्वत: दु:खाच्या असह्य वेदना ताईला सहन कराव्या लागतात.

आपल्या लहान असणाऱ्या भावासाठी, त्याच्या शिक्षणासाठी आईवडील निघून गेल्या पाठोपाठ आपण लग्न केले नाही. त्याचाही त्याग केला. वडील निघून जाताच भूपालच्या कोवळ्या मनावर परिणाम होऊ नये म्हणून आपण सर्व दु:ख सहन केले असे तिला वाटते.

आपल्या वाट्याला येत असलेल्या दु:खाची सर्व कारणे व परिस्थिती ताईने आपल्या डायरीत लिहून ठेवलेली असते. ताई भूपालला ती डायरी वाचायला देते. तिने एका डायरीत लिहिले होते, ''माणसाचे मन म्हणजे उफाड्या वाढणारे झाड तेव्हा शेंडा खुडला तरी झाडाची वाढ थांबत नाही. दोन वर्षे मन मारून भूपालच्या आठवणीने व्याकुळ होत होते.''[२]

तिने आपल्या भावासाठी आपल्या सुखाचाही त्याग केला होता. आपणावर प्रेम करणाऱ्या मास्तरला तिने नकार दिला होता आणि त्याच्यासाठी दु:खाच्या असह्य वेदना ती सहन करत होती.

'नांदाय जाते' या कथेत ग्रामीण भागातील प्रेमाचे व स्वत:च्या जीवनात येऊ पाहणाऱ्या स्त्रीची व घरातील विरोधाने ती दुसऱ्याच्या घरी निघून जाते तेव्हा होणारे दु:ख यांचे चित्रण या कथेत आले आहे. ती लग्न करून दुसऱ्याच्या घरी निघून जाते तेव्हा त्यांचे संपूर्ण आयुष्य उदध्वस्त होते आणि दु:खाच्या असह्य वेदना त्याला सहन कराव्या लागतात.

'मुके कढ' या कथेत ग्रामीण भागातील संसारात दु:ख पेलून काबाडकष्ट करणारी स्त्री म. भा. भोसले यांनी चित्रित केली आहे. ती अशिक्षित असून पती बरोबर कष्ट करते व संसाराला हातभार लावते. स्वत: दु:ख सहन करून चेहऱ्यावरील हास्य, समाधान ती दुसऱ्यापर्यंत पोहचवते. आपल्या नणंदेकडून होणारा छळ ती सोसते. मुकपणाने सर्वकाही सहन करते.

आपल्या मुलावर व आपणावर होणारा अन्याय पाहून तर तिला राहावत नाही. पतीस सांगावे व याचा शेवट करावा असे तिला वाटते पण ती तसे करत नाही कारण आपली नणंद म्हणजे नवऱ्याने टाकलेली स्त्री, तिचा आधार तुटेल, तिच्यावर दु:खाचा डोंगर कोसळेल हे सारे तिला पटते व ती

स्वत: दु:ख सहन करते. म्हणजे असह्य परिस्थितीत ही सर्व सोसून दु:खाला सामोरे जाणारी स्त्री येथे दिसते.

'खिल्लारी जोडी', 'मुकामार', 'भणंग भिकारी', 'नवा करार', 'तो मला हवा होता' या कथातूनही दु:खाला सामोरे जाणारा नायक दिसतो. जीवनात दु:ख किती तीव्र असते व त्याच्या यातना किती सहन कराव्या लागतात यांचे चित्रण या कथेतून येते.

**✳ बलुतेदारी पद्धतीचे चित्रण :-**

ग्रामीण जीवनात दिलदार व उदार मनाचा शेतकरी बऱ्याच प्रमाणात दिसतो. त्यांचे चित्रण मं. भा. भोसले यांच्या कथेत आले आहे. दुष्काळात बलुतेदाराकडून धान्य स्वीकारणारा व नंतर पुढच्या सुगीच्या दिवसात त्याला जगण्यासाठी पैसे घेऊन तो धान्य देत नाही तर बलुत्यापोटी तो धान्य त्याला तो देतो. याचे चित्रण 'बळीराजा' या कथेत येते.

शेतकऱ्याला दु:खाला व दारिद्र्याला सामोरे जावे लागत असले तरी व कठोर परिस्थितीला त्यांला तोंड द्यावे लागत असले तरी ज्यावेळी निसर्ग साथ देतो तेव्हा तो बलुतेदारांचा, जनसामान्यांचा वाली असतो. अडेल त्याला तो मदत करतो. बलुतेदार हा शेतकऱ्यावर आवलंबून असतो त्यांला सहाय्य करणे तो आपले कर्तव्य समजतो. या बलुतेदारी प्रभावी चित्रण येथे आले आहे.

**✳ अंधश्रद्धेचे चित्रण :-**

ग्रामीण परिसरातील माणूस अशिक्षित असल्याने, त्याला बऱ्याच गोष्टींची जाण कमी असल्याने तो अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला असतो. आणि ग्रामीण कथेत त्या अंधश्रद्धेचे प्रभावी चित्रण झालेले आढळते.

'मुके कढ' या कथेतील नायिका गोजरा दु:खाच्या असह्य वेदना सहन करत जगते. आपल्यावर व मुलावर होणारा अन्याय तिला सहन होत नाही. आपला मुलगा वसंत घास पहिली झालेली तव्यातील भाकरी ती देऊ शकत नाही. त्याची ती समजूत काढते. पहिली भाकरी देवबाप्पाला हवी. प्रत्येक

पहिली गोष्ट देवाला द्यायची असते असे ती त्याला सांगते. व ते वसंताच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करते. इथे ती अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली दिसते.

खेड्यातला माणूस अंधश्रद्धेच्या आहारी जास्त प्रमाणात जात असतो त्याचे बऱ्याच प्रमाणात चित्रण आजपर्यंतच्या कथेतून झालेले आहे. भोसले यांच्या कथेतूनही काही प्रमाणात त्याचे चित्रण आले आहे.

## ✳ देशप्रेमाचे चित्रण :- ✓

स्वातंत्र्यपूर्व काळ हा राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या म्हणावा तेवढा जागृत नसला तरी 'चलेजाव' च्या चळवळीने तो जागृत झाला. यावेळी विविध जाती धर्माचे लोक आपल्या धर्मापेक्षा सर्वांशी सलोख्याने राहण्याचे पसंत करत.पुढे देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा खेड्यातला माणूसही जागृत होऊ लागला. याचे प्रभावी चित्रण त्यावेळी कथेतून साकार होऊ लागले.

म. भा. भोसले यांच्या 'नवी पिढी' या कथेत जागृत देशभक्ती आणि मित्रासाठी सर्वस्वाचा त्याग या गोष्टी या कथेत दाखवून दिल्या आहेत.

देशात ज्यावेळी जातीय दंगली उसळल्या त्यावेळी जाळपोळ, हत्याकांड यांना ऊत आला. त्याच्याकडे नवी पिढी आकर्षित झाली. पण मोठ्या माणसांनी त्याला ज्यास्त खतपाणी घातले. त्या तरूणांना दुष्कृत्य करण्यासाठी त्यांनी जास्त प्रवृत्त केले. त्यामुळे मित्रत्वाचे नाते विसरुन तरुण नको त्या चुका करू लागले. आणि देशभक्तीला विसरले. पण खरोखरच ज्याच्या मनात देशभक्ती रुजली आहे तो सारे पाश तोडून देतो, आणि देशभक्ती जपण्याचा प्रयत्न करतो, याचीच जाणीव या कथेतून भोसले यांनी करून दिली आहे.

या कथेत देशाला स्वातंत्र्य मिळू पाहण्याचा काळ ज्यावेळी होता तेव्हा एका बाजूला कायदे आझम जिनांनी पाकिस्तानची घोषणा केली तेव्हा त्याला प्रतिकार करण्यासाठी राष्ट्रीय सरकार स्थान झाले. तेव्हा ज्या देशात हिंदू-मुसलमान भावासारखे वागत होते तेथे ते एकमेकांचे वैरी वाटू लागले. शिवरी गावातील हिंदू व मुसलमान कधीच वेगळे वाटत नसत. पण आता कलकत्याच्या भेसूर हत्यांकांडाची वर्णने

त्यांच्या कानावर येऊ लागली तेव्हा त्यांची मने बदलली. यातील सखाराम व कासम या दोन मित्रातला संघर्ष विकोपाला जातो. पण ज्या देशातील माणसावर आपण प्रेम करतो तो देश आपला आहे याची जाणीव कासमला झाली व सखारामवर आपण केलेल्या हल्ल्याची तो माफी मागतो. येथे खऱ्या देशप्रेमाचे चित्रण पाहावयास मिळते.

'लढाई थांबली' या कथेतही दुसऱ्या महायुद्धाच्या काळात देशसेवा हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन मित्र राष्ट्राबरोबर लढणारा युवक दिसतो. देशावर प्रेम करून स्वत:च्या कुटुंबाला आधार देणे हे तो आपले कर्तव्य समजतो.

## ✳ मानवता / माणुसकी : -

ग्रामीण समाजात मानवतेला प्राधान्य दिले जाते. माणुसकी जपली जाते. खाल्लेल्या अन्नाला जागण्याची वृत्ती माणसांच्याकडे असते. याचे चित्रण म. भा. भोसले यांच्या कथेत आले आहे.

'शिवना परीट' या कथेतला नायक शिवना आपणावर होणाऱ्या अन्यायाने पेटून उठतो. स्वत:ला मिळालेला हक्क तो सोडायला तयार होत नाही. मुळात त्याची वृत्ती माणुसकी जपणारी आहे. माणूस म्हणून जगत असताना पिढ्यानपिढ्या श्रीमंत असणाऱ्या सावकाराला संकटातल्या खाईतून तो वाचवतो. स्वत: साठवून ठेवलेले धान्य तो सावकाराला देतो. त्याचे हे कर्ज सावकाराला फेडता न आल्याने सावकाराकडून त्याला दोन एकर जमीन मिळते. पुढे नवे सरकार येते तेव्हा त्याने काढलेल्या कूळ कायद्याच्या आधारे सावकाराला दोन एकराचा मोह सुटतो आणि कोर्टात शिवना हा सावकार व सावकार हा कुळ या अर्थाने ती जमीन सावकाराला मिळते. या प्रसंगाने शिवना पेटून उठतो व सावकारावर कुऱ्हाड चालवायला तयार होतो. पण सर्व परिस्थितीचा विचार करता सावकाराने असे का वागावे हे त्याला कळत नाही, हे कोडे त्याला सुटत नाही. सावकाराची जात उपकार कर्त्यावर बेईमान होणारी आहे असे म्हणून साऱ्या सावकार जातीला तो दोष देतो, व त्याच्यावर हल्ला करण्यासाठी तो तयार होतो. पण पुढे त्याचे मन बदलते आणि आपली जात सावकाराची नाही असे त्याला वाटून दोन एकराची जमीन परत देण्याचा तो विचार करतो.

मानवता व परोपकारी वृत्ती जपणारा शिवना शेवटी सावकाराला माफ करतो याचे प्रभावी चित्रण या कथेत आले आहे.

'महापूर' या कथेत तर म. भा. भोसले यांनी एकमेकाविषयी संघर्ष करूनही संकटात सापडलेल्या लोकांना मदत केली जाते व माणुसकी जपली जाते. खेड्यात व्यक्ती व्यक्तीत, जातीजातीत एकमेकांना श्रेष्ठ, कनिष्ठ मानले जाते पण एका महापुराच्या तडाख्यात सापडलेल्या दुसऱ्या बाजूच्या लोकांना मदत केली जाते. यावेळी हवेदावे बाजूला ठेवले जातात. ग्रामीण समाजातला हा महत्वाचा घटक इथे जपला जातो.

'जिवंत पोरं' या कथेत तर एका लग्नासाख्या धार्मिक कार्यावर बहिष्कार टाकणाऱ्या व नंतर आपली चूक कळून आल्यानंतर माणुसकीचा विचार करणाऱ्या तरूणांचे चित्रण येते.

रामूदाजीच्या घरी लग्नाचा घाट घातला गेलेला असताना आपणास केवळ चहा मिळाला नाही म्हणून मारूती व त्याचे साथीदार रूसून बसतात. ते पाणी आणत नाहीत, पण ज्यावेळी रामुदाजी स्वत: घागर हाती घेतात तेव्हा त्यांना आपल्या कृत्याची लाज वाटते व ते माणुसकीपोटी रामूदाजींची माफी मागून पुढील कार्याला लागतात.

माणुसकीचे जिवंत जितेजागते चित्रण 'मानवी मन' या कथेत प्रत्ययास येते. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याचे मन किती दिलदार असते, तो मनाने किती श्रीमंत असतो. दुसऱ्यासाठी तो काहीही करतो याची जाणीव येथे होते.

बेंदूर या सणाच्या दिवशी तात्या कुलकर्णी या प्रतिष्ठित व्यक्तीला दौलती बैलगाडी जुंपून देत नाही. आपण त्यांना नकार दिला हे आपण बरोबर केले असे त्याला वाटते. पण बळी चव्हाणाला बैलाने मारले आहे हे त्याच्या कानावर येते तेव्हा सारे काही विसरुन तो त्याला मिरजेला नेण्यासाठी गाडी जुंपून स्टेशनपर्यंत पोचवतो व माणुसकी जपतो. रक्ताच्या नात्यापेक्षा माणुसकीचे नाते तो जास्त जपतो.

वास्तविक शेतकरी वर्गात हे माणुसकीचे नाते जास्त प्रमाणात जपले जाते. कोणत्याही मायेच्या माणसासाठी त्याचे मन व्याकुळ होत नाही तर कुठल्याही मानवी दु:खाने त्याचे मन व्याकूळ होते.

प्रतिष्ठेच्या व पैशाच्या तालावर नाचणाऱ्या माणसाला शरण न जाता स्वत:जवळ असणारी माणुसकी जपणे हे ग्रामीण माणूस पसंत करतो याचे प्रभावी चित्रण भोसले यांच्या ग्रामीण कथेतून झालेले आढळते.

'बळीराजा', 'आंधळे प्रेम', 'माझा सुताडाच बरा' या कथेतूनही माणुसकी दाखविणारे चित्रण झालेले आढळून येते.

**✳ कौटुंबिक जीवनाचे चित्रण :-**

शेतकरी वर्गाच्या कौटुंबिक जीवनाचे चित्रण बऱ्याच प्रमाणात ग्रामीण कथेतून झालेले आढळते. ग्रामीण परिसरात वावरणारा, शेतीत राबणारा शेतकरी आपले कौटुंबिक नाते जपण्याचा प्रयत्न करतो. तो आपल्या पत्नीवर जीवापाड प्रेम करतो.

'अहेव लेणं' या कथेत म. भा. भोसले यांनी कौटुंबिक जीवनातील प्रसंगातून आपली कुटुंबाविषयी असणारी आपुलकी व्यक्त केली आहे. आपल्या पत्नीवर जीवापाड प्रेम करणारा रामजी आपल्या पत्नीची इच्छा पूरी करू शकत नाही, तेव्हा त्याला आतोनात दु:ख होते. कारण आयुष्यभर तिने केलेली साथ, तिचे आपणावर असणारे प्रेम या साऱ्या गोष्टी त्याला शेवटी अंथरुणाला खिळल्यानंतर आठवतात. तेव्हा तो मुलगा दिलीप यांस बोलावतो. आपण पत्नीसाठी जे दीड तोळ्याचे साजाचे डोरले आणणार होतो ते तो त्याला आणायला सांगतो. जेव्हा त्याचा मुलगा दिलीप ते दीड तोळ्याचे डोरले घेऊन येतो तेव्हा रामजी पत्नी सगुणा हिच्या गळयात ते घालायला सांगतो. येथे आयुष्याच्या शेवटी त्यांने कौटुंबिक नाते जपल्याचे जाणवते.

ग्रामीण भागात संसारात दु:खाला सामोरे जाऊन कष्ट करणारी स्त्री आपल्या पतीला आपल्या जीवनातील काही गोष्टी सांगू शकत नाही. या सासुरवाशीण स्त्रीला कुटुंबात वावरताना अनेक बंधनांना सामोरे जावे लागते, होणारा छळ सहन करावा लागतो. तेव्हा एक शब्दही न उच्चारता ती हे सर्व सहन करीत असते, आणि कौटुंबिक नाते जपते.

'मुके कढ' या कथेत या प्रकारची स्त्री वावरताना दिसते. आपल्या नणंदेकडून आपणावर व आपल्या मुलावर होणारा अन्याय ती सहन करते व आपल्या नणंदेवर संकट कोसळू नये

म्हणून तिच्याकडून होणाऱ्या त्रासाची ती आपल्या पतीला कल्पना देत नाही. ही कौटुंबिक जीवनाला आवश्यक असणारी परिस्थिती ग्रामीण भागात तयार होत असते.

'भागीदारीण' या कथेतही पुरूषाबरोबर कष्ट करून त्याच्या बरोबर धाडसाने वावरणारी स्त्री दिसते. शिवरामच्या शेतात भागीदारीपद्धतीने काम करून शेवटी त्याच्या संसाराचीही ती भागीदारीण बनते. कष्ट करून एकमेकांना साथ देणे हे कौटुंबिक जीवन येथे साकारले गेले आहे.

या कथेतला नायक शिवराम संसार चालविणारी व आपणास आयुष्यभर सुख देणारी पत्नी म्हणून बाळकाचा स्वीकार करतो व त्या दृष्टीनेच तो तिच्याकडे सुरवातीपासून पाहात असतो.

'आंधळे प्रेम', 'सखा गालात हसला' याही कथा कौटुंबिक प्रेमाचे चित्रण घडवितात व हे जीवन कसे असते याचा प्रत्यय आणून देतात.

**✳ प्रेमाचा त्रिकोण :-**

एखाद्या प्रसंगातून निर्माण झालेल्या रागाचे रूपांतर ज्यावेळी प्रेमात होते त्यावेळी तिथे प्रेमाचे तत्त्व जपले जाते. भोसले यांच्या कथेतून अशा प्रकारच्या प्रेमाचे चित्रण बऱ्याच कथातून झालेले आढळते. 'सखा गालात हसला' ही कथा एका भावनाप्रधान प्रेमाची कथा आहे. आपल्या स्वत:च्या मळीत नदीपलिकडील वाडीची म्हैस येते व शेवऱ्या आणि पावट्याच्या जाळ्या खाऊन जाते. पण आपण काहीच करू शकत नाही. तेव्हा एकदा तो त्या म्हशीला बांधून घालतो तेव्हा तिची मालकीण येते. तेव्हा तिच्या बोलण्याने तो मोहित होतो आणि तिच्या प्रेमात पडतो.

'नांदाय जाते' या कथेत शहरी जीवनापासून अलिप्त असणाऱ्या एका वेगळ्या प्रकारच्या प्रेमाचे चित्रण झालेले आढळते. स्वत:च्या जीवनात येऊ पाहणारी स्त्री व आपण तिच्यावर उत्कट प्रेम करत असताना तिच्या कुटुंबातील व्यक्तींच्या विरोधामुळे तिचा दुसऱ्याशी विवाह होतो. तेव्हा तिच्या संबंधीच्या प्रेमाच्या भावना तो शेवटपर्यंत जपण्याचा प्रयत्न करतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
LIBRARY

'लढाई थांबली' या कथेतला नायक रामू हा सोनीवर जिवापाड प्रेम करतो. तिच्याबरोबर आपण संसार थाटावा असे त्याला वाटते पण संभू सपकाळ लढाईवरुन परत येतो तेव्हा सोनी त्याच्याकडे आकर्षित होते. त्यावेळी रामूला आतोनात दु:ख होते.

सुखी आणि समाधानी जीवन जगण्यासाठी केवळ प्रेमच उपयोगी पडते असे नाही तर त्यासाठी पैसा हवा असतो याची जाणीव त्याला होते, व त्यासाठी तो प्रेमाचा त्याग करायला तयार होतो. या कथेतील नायिका सोनी हिला सुद्धा आपणास पैसा असणाराच सुखी ठेवू शकतो हे जाणते व रामूचा त्याग करून ती संभू बरोबर संसार थाटते.

ग्रामीण परिसरातल्या प्रेमाला एक वेगळ्याच प्रकारचे वैशिष्ट्य प्राप्त झालेले असते. समाजात वावरताना खेड्यातील तरूणी स्वत:च्या एका वेगळ्या ढंगात वावरते. जशी ती लाजरीबुजरी असते तशीच ती धाडसी, हजरजबाबी व करारीही असते, याचे चित्रण 'तो मला हवा होता!' या कथेत येते.

नदीवर म्हैस घेऊन जाणारी चतुरा एका तरुणाला पाहिल्यानंतर त्याच्यावर मोहित होते व त्याच्या भेटीसाठी ती आतूर होते. म्हणजे तो तिला हवा असतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच्याबरोबर आपले लग्न व्हावे असे वाटणाऱ्या स्त्रीच्या जीवनात तो येत नाही. तो तिला मिळू शकत नाही तेव्हा तिच्या कुचंबलेल्या मनाचे व उदासीनतेचे उदात्त चित्रण भोसले यांच्या या ग्रामीण कथेतून पाहवयास मिळते.

**✳ उपेक्षितांबद्दलची सहानुभूती :-**

समाजात काही घटकापासून वंचित असणाऱ्या उपेक्षित लोकांचे चित्रण ही ग्रामीण कथेतून झालेले आढळते. म. भा. भोसले यांच्या कथेतही त्याचे चित्रण आले आहे.

'नवा करार' ही कथा समाजातील काही घटकापासून वंचित असणारी कथा आहे. तमासगीरांच्या उपेक्षित जीवनाचे चित्रण या कथेत झालेले आढळून येते. तमाशा कलावंत आपल्या कलेची सेवा करताना प्रामाणिकपणे करतो. या कलावंताच्यात निष्ठायुक्त प्रेम असते. तिच्यासाठी तो सर्वस्वाचा त्याग करायला तयार असतो. या संबंधीचे चित्रण या कथेतून भोसले यांनी केले आहे. म्हणजे भोसले यांना उपेक्षितांच्या बद्दल सहानुभूती आहे.

'बळीराजा' या कथेतही एका दिलदार मनाच्या शेतकऱ्याला दुष्काळात एका बलुतेदाराने धान्य देऊन सहकार्य केलेले असते म्हणजे भोसले यांनी बलुतेदारांच्या बद्दल एक वेगळीच प्रतिमा आपल्या कथेतून साकार केली आहे.

**✳ निसर्गाचे चित्रण :-**

मराठी साहित्यात आजपर्यंत निसर्गाचे झालेले चित्रण मानवी मन आकर्षित करणारे ठरले आहे. निसर्ग मानवी मनाला आनंद देतो. माणूस त्या निसर्ग सौंदर्यात वावरतो तेव्हा तो आपली सुख, दुःखे विसरतो या दृष्टीने निसर्गाकडे पाहिले गेले आहे.

ग्रामीण कथेत चित्रित होणारे निसर्गाचे चित्रण त्या ग्रामीण कथेला सौंदर्य प्राप्त करून देणारे ठरते. आत्तापर्यंतच्या सर्वच कथेत येणारा निसर्ग त्या प्रदेशातील वातावरणाचे प्रभावी चित्रण करणारा ठरला आहे.

म. भा. भोसले यांच्या कथेत येणारा निसर्ग त्यांच्या कथेत आलेल्या ग्रामीण वातावरणाला साजेसा ठरतो. कथेत येणारे इतर प्रसंग, वातावरण यांना प्रभावी स्थान देण्यास तो कारणीभूत ठरतो. त्यांच्या बहुतांशी ग्रामीण कथेत येणारा निसर्ग त्या प्रादेशिक चित्रणाला तर जवळचा ठरतोच पण मानवी मनाचे स्थान व्यक्त व्हायला तो अधिक कारणीभूत ठरतो.

'नवा करार' या कथेतल्या वातावरण निर्मितीला भोसले यांनी केलेले निसर्गाचे वर्णन अत्यंत प्रभावी ठरले आहे.

''आषाढी बेंदराचा दिवस. रात्री नऊची वेळ. आकाशात चंद्र बराच वर आला होता. ढगांच्या झाकणांनं त्याचं ओझरतं दर्शन देखील होत नव्हतं. झडीच्या झिमझिमीला केंव्हा सुरुवात होईल याचा नेम नसल्याने प्रत्येक जण काळजीत होता. पण निसर्ग काही अगदीच खुळा नसतो ! बैलांच्या मिरवणुकीचा तो एकंदर थाट, अनेक वाद्यांचा गगनभेदी सनसनाट व बत्यांचा तो डोळे दिपवणारा झगझगाट पाहून ढग सुद्धा आपला दैनंदिन कार्यक्रम स्थगित करून कौतुकाने तटस्थ राहिले होते झिमझिमिला सुरवात करून त्या मिरवणूकीचा बेरंग करायचं त्याच्या जिवावर आलं असावं !''[३]

'नांदाय जाते' या कथेतल्या निसर्गचित्रणातून तर भोसले यांनी एका विशिष्ट प्रसंगाचे दर्शन घडविले आहे. ''त्या शेताच्या तिन्ही बाजूंनी जोंधळा तरारला होता. पुरुषभर उंचीचा तो कणसाळलेला घनदाट जोंधळा भिंतीसारखा वाटत होता. त्या तीन भिंतीच्या मधे ते हरभऱ्याचं शेत-शेत कसलं, लक्षावधि लोक पहुडले तरी ज्याचा एक कोपराहि भरायचा नाही असा हिरवागार मऊ गालिच्याच जणू ! मधून मधून परलेल्या त्या काळपट, हिरवट रंगाच्या करडईच्या काकरी त्या गालिच्यावरील नक्षीकामाच्या रेषाच भासत.''[४]

या निसर्ग चित्रणातून ग्रामीण कथेला रंगतदार बनविण्याचे काम भोसले यांनी केले. ग्रामीण कथेत चित्रित होणारे निसर्ग चित्रण हे एका विशिष्ट प्रदेशातील असल्यामुळे ते उठावदार तर होतेच पण प्रादेशिकता दाखवून द्यायला ते अधिक कारणीभूत होते.

**✳ म. भा. भोसले यांच्या कथेतील कथानक :-**

म. भा. भोसले यांनी ग्रामीण साहित्याला स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिल्याने वाङ्मयाला त्यांच्या कर्तृत्वाचा वेगळाच परिचय होतो. ग्रामीण साहित्यातून ग्रामीण मनाचा शोध घेणे हा त्यांचा मूळ उद्देश असल्याने त्यांच्या ठिकाणची नम्र अभ्यासकाची भूमिका स्पष्ट होते.

आपल्या कथेत भोसले ग्रामीण चित्रण रेखाटतात तेव्हा कथा प्रभावी आणि समृद्ध व्हायला ते कथानकाला जास्त प्राधान्य देतात. मुळात त्यांची कथा प्रत्यक्ष एखाद्या पाहिलेल्या अनुभवातून जन्म घेते. त्यामुळे मुळातच कथाबीज जर तयार असेल तर कथा कथानकाच्या दृष्टीने समृद्ध व्हायला काही अडचण येत नाही.

त्यांनी चालू असलेल्या नेहमीच्या जीवनातूनच कथाबीज निवडले. हे करत असताना त्यांनी लिहायचे म्हटले की त्यांत काहीतरी सांगण्यासारखे, कांहीतरी ऐकण्यासारखे तसेच नेहमीच्या चालू जीवनापेक्षा काहीतरी निराळे, वेगळे आगळे असे अपवादात्मक घडणारे कांहीतरी असायलाच पाहिजे ही खबरदारी घेतली.

भोसले यांनी ज्या विशिष्ठ पद्धतीने कथा लिहिल्या त्यासाठी जीवनातला, वास्तवातला एखादा प्रसंग त्यांनी कथेसाठी निवडला आणि कथा घडत गेली.

'अहेव लेणं' ही कथा कथानकाच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी आहे. जीवनात आलेल्या एका प्रसंगाचा त्यातून आविष्कार झाला आहे. वास्तवात आपण आपल्या वहिनीची असणारी एखादी साधी इच्छा पुरी करू शकत नाही यांची भोसले यांना खंत आहे. वहिनीची दीढ तोळ्याच्या टीकेची केलेली मागणी व ती आणण्यासाठी आपणास लागलेला विलंब पाहता त्यानंतर एक वेगळेच घडते तेव्हा त्यांना ती टीक आणून द्यावी लागली. या एका वास्तव प्रसंगावर 'अहेव लेणं' या कथेचा जन्म झाला.

या कथेतला नायक रामजी आपल्या पत्नीची असणारी इच्छा बरेच दिवस पुरी करु शकत नाही. पण अंथरूणावर पडून ज्यावेळी तो अखेरच्या घटका मोजू लागतो तेव्हा पत्नीला दिलेल्या वचनाची त्याला आठवण होते आणि त्याही परिस्थितीत तो आपल्या मुलास दिलीप यांस सांगून दीड तोळ्याचे साजाचे डोरले आणतो व तिला गळ्यात घालण्यास सांगतो आणि आपल्या मनावर असलेला ताण कमी करतो व शेवटी अखेरचा श्वास घेतो.

कथानकाच्या दृष्टीने 'खिल्लारी जोडी' ही कथा सुद्धा अत्यंत प्रभावी ठरली आहे. गावातील इनामदाराची प्रचंड ताकतीची देशी बैले विकली गेली आणि त्या जागी नकली खिल्लारी जोडी आली हे पाहून लेखकाला दु:ख झाले व त्यांनी एका शेतकरी कुटुंबातल्या धाडसी तरूणाची व त्याच्या प्रचंड ताकदीची बैलांची कथेसाठी कथानक म्हणून निवड केली. आपली प्रचंड ताकदीची बैले विकून आपण दिसायला आकर्षक असणारी खिल्लारी जोडी घेतली पण पूर्वीच्या देशी बैलानी ही पैज जिंकून दिली होती तशा प्रकारचे ताकदीचे काम ही खिल्लारी बैले करू शकत नाहीत हे त्याच्या लक्षात येते, तेव्हा त्याला दु:ख होते. त्याची आई त्याला त्याच्या चुकीची जाणीव करून देते व ती बैलेच आपल्या दावणीला वासराच्या रूपाने पुन्हा जन्माला आली आहेत असे ती सांगते. एकूणच कथानकाच्या दृष्टीने ही कथा अत्यंत प्रभावी ठरली आहे.

'मुका मार', 'भाकरी शपथं खरं', 'मुके कढ' या कथा कथानकाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. ग्रामीण कथेत त्या प्रसंगाचे, वातावरणाचे चित्रण करायला ज्या गोष्टीची आवश्यकता आहे

त्या साऱ्या गोष्टी या कथेतील कथानकामुळे साकार झाल्या आहेत. कथानक जेवढे जेष्ठ असेल तेवढीच ती कथा वाचकांच्या पर्यंत पोहचलेली दिसते. तसेच ती कथा वाचकांच्या मनाची पकड घेणारी ठरते. याची जाणीव म. भा. भोसले यांच्या कथा वाचल्यानंतर होते.

## ✳ म. भा. भोसले यांच्या कथेतील स्वभाव चित्रण :-

ग्रामीण कथेत रक्ताच्या नात्यापेक्षा माणुसकीचे नाते कसे जपले जाते व ते जपत असताना परिसरातल्या व्यक्तींचा स्वभाव वेगवेगळ्या प्रकारे परिचित होतो. म. भा. भोसले यांच्या कथेतून ग्रामीण परिसरात वावरणाऱ्या व्यक्तींच्या स्वभावाचे चित्रण प्रभावीपणे झाले आहे.

कोणतेही मानवी मन मायेच्या माणसासाठीचं व्याकुळ होते असे नाही तर ते कुठल्याही मानवी दुःखाने व्याकुळ होते याचे उत्कट चित्रण 'मानवी मन' या कथेतून भोसले यांनी केले आहे. या कथेतील दौलतीचा स्वभाव असा होता की संकटात सापडलेल्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारे मागेपुढे न पाहता मदत करणे, त्यामुळेच बळी चव्हाणाला बैलाने मारल्यानंतर त्यांला पाहण्यासाठी त्यांचे मन अधिर होते व श्रृंगारलेले बैल तिथेच सोडून तो बळीला पाहायला जातो.

या कथेत दौलतीच्या कणखर आणि स्वाभिमानी स्वभावाचे चित्रण झालेले दिसून येते. तो तात्या देसाई यांना म्हणतो, ''आतं का ताटत उभा राहिलाय ? इथं बसा नाहीतर जा तरी ! आतां दोन तासाच्या आतं तुमचं घर रिकामं करतो !''[५]

'जिवंत पोरं' या कथेत रामूदाजीच्या स्वभावाचे चित्रण निवेदनाच्या माध्यमातून केले आहे. बऱ्याच वेळा स्वभावचित्रणातून माणसाच्या साहस व सहनशीलतेचे चित्रण घडते. अंगची दांभिकवृत्ती, मनमानी कारभार व स्वार्थ या गोष्टी स्वभाव चित्रणाला जवळच्या ठरतात. स्वभावचित्रणातून व्यक्तीचे दोष तर चित्रित होतातच पण त्यांच्या अंगभूतवृत्तीचे व विविध गुणांचे चित्रण जास्तीत जास्त स्वरूपात साकार होते. हाच अनुभव 'जिवंत पोरं' या कथेतल्या व्यक्तिचित्रणाच्या स्वभावातून येतो. भोसले यांनी रामूदाजींच्या स्वभावाचे चित्रण अत्यंत प्रत्ययकारी शब्दात केले आहे.

''रामूदाजी आतां तसलं काहीच करणार नाहींत. बिचारे एक शब्दसुद्धां अधिक न बोलता निघून गेले. आपल्या पोरांनी असा खुळेपणा करावा म्हणून ते मनातल्या मनात जळतील ! कुणाला रागानं काहीच बोलणार नाहींत, उलट कुणांचे तरी पाय धरुन आतां चार घागरी पाणी आणायला विनवतील !''[६]

अशा या गरीब, सालस नि सज्जन रामूदाजींचे चित्रण या कथेतून येते.

'अहेव लेणं', 'लढाई थांबली' या कथेतूनही स्वभावचित्रणाला प्राधान्य दिले गेले आहे. मानवी स्वभावाच्या विविध पद्धती भोसले यांनी चित्रित केल्या आहेत.

## ✳ म. भा. भोसले यांच्या कथेतील वातावरण निर्मिती :-

कोणताही प्रसंग, घटना चित्रित होत असताना तो प्रभावीपणे ज्यावेळी चित्रित होतो तेव्हा वातावरण निर्मिती केली जाते. तरच त्या घटनेला अथवा प्रसंगाला वजन राहते. ग्रामीण कथेतील एखादी घटना अथवा प्रसंगाचे चित्रण व्हायला वातावरण निर्मिती फार जवळची ठरते.

'शिवना परीट' या कथेत सावकाराने केलेल्या बेईमानीमुळे शिवना संतापतो, पेटून उठतो आणि हातात कुऱ्हाड घेऊन शेतात जाऊन सावकाराचा सूड घ्यायचा असा निश्चय करतो. व तिथे जाऊन त्याची वाट पाहतो. त्यासाठी तो कुऱ्हाड निसण्यावर लावतो व तिला धार आणतो. वीस वर्षे तिची रक्ताची भूक भागली नाही ती आज तृप्त होणार अशी त्याला आशा वाटते. लावलेल्या कुऱ्हाडीवर तो आबदार आंगठा फिरवतो तेव्हा त्याच्या आंगठ्याला चिर पडते. ती कुऱ्हाड पाहून घाबरलेल्या पत्नीच्या व आईच्या शब्दांना डावलून तो रानात जातो. तेव्हा त्याच्या समोर एकच दृश्य दिसत होते. जमीनीचा कब्जा घ्यायला येणारा सावकार आपा देसाई व त्याच्यावर आपण कुऱ्हाड चालवतोय.

'नवी पिढी' या कथेत तर स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या देशाच्या परिस्थितीचे चित्रण प्रभावीपणे रेखाटले आहे. राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी बॅरिस्टर जीना यांनी मुसलमान जनतेला आवाहन केले तेव्हा भारतातल्या खेड्यांची जी अवस्था झाली त्यांचे प्रभावी चित्रण या कथेत येते. 'शिवरी' गावातल्या मुसलमान जनतेवर कलकत्याच्या भेसूर हत्याकांडाचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला व

गावात निघणाऱ्या सेवादलाच्या मिरवणूकीवर मुसलमान तरूणांनी हल्ला केला. या घटित प्रसंगासाठी सुरूवातीला केलेली वातावरण निर्मिती अत्यंत महत्त्वाची ठरते.

''पूर्वी तिथला एखादा माणूस पाहून हा हिंदू आहे की मुसलमान आहे असं परक्याला कधीच सांगता आलं नसतं, इतके हिंदूमुसलमानांचे रीतिरिवाज सारखे होते. पण आता ते मुसलमान दिसू लागले होते. कारण गुळगुळीत दाढी करून घेण्यात ज्यांना आनंद वाटत होता त्यांनी आता दाढीचे खुंट वाढविले. धोतर टाकून तुरपलेल्या विजारी वापरायला त्यानी सुरुवात केली. फेट्यांना रजा देऊन त्यांच्या डोक्यावर आतां टीचभर गोंड्याच्या काळ्या तांबड्या उंच टोप्या दिसू लागल्या. हिंदू पद्धतीने भांड्याला आतून केलेली कल्हई त्यांना काढता येणे शक्य नव्हते तरी मुस्लीम पद्धतीप्रमाणे त्यांनी सगळ्या भांड्यांना बाहेरून कल्हई करून घेतली, आणि ज्यांना मशिद नि नमाज यांचा गंधसुद्धा नव्हता अशा कोवळ्या पोरासोरांना धरुन ते रोज पाचवेळा मशिदीत नमाज पढूं लागले.''[७]

ग्रामीण कथेत येणाऱ्या चित्रणाला भरीव स्वरूप येण्यासाठी व कथा उठावदार बनण्यासाठी वातावरण निर्मिती करणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

'खिल्लारी जोडी' या कथेतल्या हंबीर साळुंख्याने आपल्या पठाण व धुमाळ या बैलांच्या साह्याने सावकाराची पैज जिंकण्यासाठी भली मोठी लाकडाची वीट त ओढ्यातील गुडघाभर चिखलातून ओढून बाहेर काढली व ती सावकाराची पैज त्यांने जिंकली. हे भोसले यांनी या कथेत केलेल्या वर्णनाला आवश्यक ती वातावरण निर्मिती त्यांनी केली आहे.

''दुसऱ्या दिवशी सकाळीच हंबीरने आपले पठाण व धुमाळ हे बैल गाडीला जोडून गाडी चालू केली. हत्तीसारख्या भासणाऱ्या त्या बैलांना मोकळी गाडी म्हणजे फुलासारखी वाटल्यास नवल नाही. केवढ्यातरी उमेदीत नि डौलांत त्यांची चाल होत होती. जणूं ते लाकूड आणून पैंज जिकण्याची ईर्षा त्यांच्या धन्याप्रमाणे त्यांच्याहि रोमरोमांत नाचत होती.''[८]

याच कथेत ग्रामीण परिसरातल्या वास्तव चित्रणाला भोसले जास्त समोरे गेले आहेत. हंबीर हा सखाराम चव्हाणाची खिल्लारी बैलांची गाडी पाहतो तेव्हा स्तंभित होतो. तो जे गाणे म्हणत होता ते ऐकण्यासाठी त्यांचे कान उत्सुक होतात -

''माझी खिल्लारी जोडी, वारा पिऊन ताल तोडी,

माझ्या बैलाची जान, नव्यां नवतीचं पान

जणूं लव्हाळ्याची खोड मोडी।।१।।''[९]

हे खेड्यातल्या खऱ्या वस्तुस्थितीचे चित्रण समोर येते व कथा प्रभावी व्हायला ते कारणीभूत ठरते.

'महापूर' या कथेतल्या संघर्षाला विशिष्ट वळण जे प्राप्त झाले ते त्या कथेतील वातावरण निर्मिती मुळेच, आणि ते चित्रित करायला कथालेखक पूर्णपणे यशस्वी झाले आहेत. पाटील आणि कूळ म्हणून समजले जाणारे शिंदे, जाधव, मोरे यांच्यातला संघर्ष लेखकाने कथेतून रंगविला तेव्हा त्यांने परिणामकारक वातावरण निर्मिती केली आहे.

''एकदां शिदू पाटलाच्या कोंबड्यांचा अख्खा कळप जाधवाच्या पोरांनी गट्टम करून टाकला. त्यांच्या पंखाचाहि पुरावा उरं दिला नाही. याचा वचपा म्हणून शिंद्यांचा उमदा बोकडच पाटलाच्या गड्यानी खतम केला. त्यांची हाडं जाधवाच्या पोरांनी पाटलाच्या उकिरड्यांवर धरली. अन जी मारामारी झाली तिचा खटला सहा महिने चालला. रानातला उद्योगधंदा सोडून दोन्ही बाजूचे गडी भाकरीची गाठोडी बांधून रोज 'तासगांवला' पळत होते.''[१०]

अशा प्रकारच्या वातावरण निर्मितीमुळे म. भा. भोसले यांची कथा उठावदार बनली आहे.

## ✳ म. भा. भोसले यांच्या कथेतील संवाद लेखन :-

नाटक या वाङ्मय प्रकारात संवादाला अत्यंत महत्त्व असते. संवादाशिवाय नाटक उभे राहू शकत नाही. त्यातील अभिव्यक्ति सौंदर्य संवादातूनच खऱ्या अर्थाने साकारले जाते. पण कथेच्या बाबतीत संवादाचा उपयोग न करताही ती लिहिली जाऊ शकते. कोणत्याही प्रकारे जरी ती कथा लिहिली तरी ती माणसाची कथा असते. संवादातून माणसांचे विविध मनोव्यापार उलगडून जातात. संवाद शब्द व हावभाव यांच्या साह्याने व्यक्त रूप धारण करतात.

म. भा. भोसले यांच्या कथेत प्रारंभी उत्सुकता वाढविण्यासाठी, कथाविषय सूचित करण्यासाठी व कथेची अखेर नवी काही तरी सांगून जाण्यासाठी संवाद लेखन महत्त्वपूर्ण ठरले आहे. कथेतल्या नायक नायिकेचे नाते कोणत्या स्वरुपाचे आहे याची ही प्रचिती त्यांच्या कथेद्वारे येते.

'मानवी मन' या कथेत दौलती आणि तात्या कुलकर्णी यांच्यातील संवाद कथेच्या अखेरीला आदर्श जीवनातील बऱ्याच गोष्टी सांगून जातात. तात्या कुलकर्णी ही एक प्रतिष्ठित व्यक्ती पण दौलती त्यांना माणुसकीचे, स्वाभिमानी जीवनाचे तत्व पटवून देतो. सत्य हाच जीवनाचा खरा धर्म आहे हे संवादाच्या माध्यमातूनही जाणवते. तात्या दौलतीला नमवायला पाहतात, त्याला गयावया करायला लावायचा ते प्रयत्न करतात पण हा स्वाभिमानी शेतकरी नमला नाही. तात्या त्याला म्हणतात -

''तू हटवादीपणा करण्यापेक्षा नरमाई दाखविलीस, विनवणी केलीस, हातापाया पडलास तर ते चांगल नाही का होणार ?''[११]

तेव्हा दौलती म्हणतो, -

''तात्या आतां मी बोललो तर तुम्हाला राग येईल, वाईट वाटेल, विनवणी माणसाची करतात, पाया देवाच्या पडतात, मी चुकूनही दगडापुढं विनवणी करणार नाही. कधीही रौतानापुढं मान वाकवणार नाही.''[१२]

'गालात सखा हसला' या कथेत बजरंग आणि रंगू या दोघामधील संवाद प्रणयाची एक वेगळीच जाणीव करून देतो. आलेला राग व संताप या साऱ्या गोष्टी संवादाच्या माध्यमातून नष्ट होतात व एका नव्या जीवनाचा शोध लागतो. तो पुढे पाहून चालू लागतो व विचारतो,

''तुमचं नाव काय ?''

''माझं नाव रंगू, तुमचं ?''

''रंग!''

''चला !काहीतरीच सांगताय् !''

''खरचं, नावं एक निघाली म्हणून घाबरलात काय ? माझं नांव बजरंग आहे.''[१३]

या संवादाने स्नेह वाढतो व कौटुंबिक प्रेमाची प्रचिती हळूहळू येऊ लागते. एकमेकांची मने कशी ओढ घेतात या गोष्टीचीही पुरेपूर जाणीव होते.

'नांदाय जाते' कथेनला संवाद कथेच्या अखेरी पूर्वायुष्यातील सारे दु:ख विसरायला भाग पाडतो. तो संवाद सारे पूर्व नातेच बदलून टाकतो. आपल्या आयुष्यात येऊ पाहणारी व आपणही तिचा पूर्णपणे स्वीकार केला आहे ती मथुरा दुसऱ्या घरी निघून जाते तेव्हा त्याला होणारे दु:ख किती तीव्र असते. पुढे तेही पूर्णपणे नष्ट होते. ती माहेरी आलेली असताना तो तिच्या घरी जातो. तेव्हा ती म्हणते,

''किती दिवसानी तुझं तोंड दिसतंय ?''

''वीस कोसांवर ते दिसायचं तरी कसं ?''

''हा घे तुझा भाचा !''[१४]

तेव्हा तोही मागचा पुढचा विचार न करता त्याला घेतो. आयुष्यात घडलेल्या सर्व गोष्टी हा संवाद विसरायला लावतो.

'नवी पिढी', 'माझी ताई', 'माझा सुताडाच बरा', 'लढाई थांबली', 'भणंग भिकारी' या कथेतून येणारा संवाद जीवनातील एका नव्या बदलाची जाणीव करून देतो. सच्चा मित्रत्वाची जाणीव हा संवाद करून देतो, तर आपल्यासाठी स्वत:चे आयुष्य खर्च करणाऱ्या व स्वत:च्या सुखावर पाणी सोडणाऱ्या एका स्त्रीची ही कहाणी संवादातून समजते.

एकंदरीत ग्रामीण कथेत संवादाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त होते त्या ग्रामीण मनाचा वेध तर संवादातून घेता येतोच पण त्याच्या जीवनाचा उलगडाही व्हायला संवाद महत्त्वपूर्ण ठरतो.

**✳ म. भा. भोसले यांच्या कथेतील निवदेनशैली :-**

कथेला रंगतदारपणा आणण्याचे व एकाचवेळी सरळ त्या विषयाची मांडणी करणे हे निवेदनपद्धतीत महत्त्वपूर्ण ठरते. ग्रामीण कथेत येणारे निवेदन हे त्या कथेचे सामर्थ्य किती आहे यांची प्रचिती यायला कारणीभूत ठरते.

म. भा. भोसले यांनी आपल्या कथेतून कुशल निवेदन केले आहे. कोणत्याही एका कथानकाचे असो अथवा एखाद्या भाववृत्तीचे ते निवदेन असो ते अत्यंत समरसतेने ते करतात. मुळात त्यांना या निवेदनाच्या माध्यमातून गोष्ट सांगायची असते.

भोसले निवेदनासाठी जी भाषा वापरतात ती नेमकी व ओघवती आहे. नेमक्या व अचूक शब्दांनी लहानमोठ्या लयबद्ध वाक्यांनी ते कथेचा तपशील निवेदन करतात त्यामुळे त्यांच्या कथेला वेग आला आहे. एखादी कुशल ललना हलक्या हातांनी रेषारेखीत जशी रांगोळी काढत जाते. त्या प्रमाणे छोटी छोटी वाक्ये वापरुन सुंदर आणि रसाळ निवेदन ते करतात.

मुळात म. भा. भोसले यांच्या कथेतले व्यापक कथाविश्व, त्यांनी चित्रित केलेली संस्मरणीय व्यक्ती-चित्रणे, त्यांचे बहुरंगी मनोदर्शन, सामान्यावर प्रकाश टाकणारी दृष्टी व कथेविषयी त्यांची असणारी निरपेक्ष भूमिका या साऱ्या गोष्टी निवेदनशैलीच्या द्वारे जाणवतात.

म. भा. भोसले यांची कथा लोकप्रिय झाली आहे, याचे कारण त्यांनी आत्मपर निवेदनपद्धतीचा (प्रथम पुरूषी) वापर जास्त प्रमाणात केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतून घटना प्रसंग,

व्यक्तिच्या मानसिक प्रक्रिया, त्याचे वास्तव जीवन या गोष्टी साकार झाल्या आहेत. त्यांच्या कथेतील पात्रापैकी मुख्यपात्रच निवेदन करते. जास्तीत जास्त कथेतून या आत्मपर निवेदनपद्धतीला प्राधान्य दिले गेले आहे.

'माझी ताई' या कथेतला नायक भूपाल आपल्या शिक्षणाविषयी व बहिणीविषयी आत्मनिवेदन करतो. आपल्या ताईचे आपणास अजून पत्र आले नाही या विषयी कथेच्या सुरुवातीलाच तो निवेदन करतो. तर कथेत पुढे तो म्हणतो, ''ताई डायरी लिहीत असते हे मला लहानपणापासून माहित होते. पण तिच्या डायऱ्या वाचण्याची इच्छा मी कधीच दाखविली नव्हती. तिने उघडून दिलेले पान मी वाचू लागलो.''[१५]

'अहेव लेणं' या कथेतल्या रामजी या मुख्य पात्राचे आत्मनिवेदन लक्षपूर्वक जाणून घेणे महत्त्वपूर्ण ठरते. आयुष्याची अखेर होताना मनात आलेला विचार व्यक्त होतो. -

''फक्त आपणच या सगळ्या माणसांतून, भरल्या घरातून, पिकल्या शेतांतून निघून जाणार एवढीच वाईट गोष्ट आहे. पण त्याततरी वाईट काय ? आपण खरं म्हणजे पूर्ण समाधानानंच जायला हवं ! काय अपुरं आहे आतां ? घरासाठी या आपुल्या मुलांसांठी जे करायचं ते आपण सगळं केलय, कुणालाहि कांही ददात पडणार नाही येवढी व्यवस्था झाल्यावर आपण कशाला काळजी करायची ? दोन एकराचे आपलं पहिलं शेत आपण आज चाळीस एकर केलं. एक बैलही पूर्वी दावणीला नव्हता, तर आतां हत्तीसारखे चार बैल आपल्या दावणीला आहेत.एका कुडाच्या झोपडीत पूर्वी आपण राहात होतो तर आता भरपेट सामानानं चिक्कार भरलेलं दहा खणी घर आपलं झालंय ! काय मुलाबाळांना कमी आहे ? कांहीं-कांहीं सुद्धा आतां अपुरं राहिलं नाही.''[१६]

एका कुटुंबातील एकात एक गुंतलेल्या भावना भोसले निवदेन पद्धतीच्या आधारे चित्रित करीत आहेत.

म. भा. भोसले यांनीं आपल्या कांही कथातून पूर्वलक्षी निवदेनपद्धतीला बऱ्याच प्रमाणात प्राधान्य दिले आहे. ही पूर्वलक्षी निवेदनपद्धती कथेला कलाटणी दयायला, कथा रंगतदार बनायला अत्यंत

कारणीभूत ठरते. घडत जाणाऱ्या घटना, प्रसंगाचे मूळ कारण पूर्वलक्षी निवेदन पद्धतीमुळे लक्षात येते. त्यामुळे बऱ्याच कथेतील ही पूर्वलक्षी निवेदनपद्धती लक्षात घेण्यासारखी आहे.

'शिवना परीट' या कथेत पूर्वलक्षी निवेदनपद्धतीचा वापर करण्यात आला आहे. सावकाराने आपणावर केलेला अन्याय व त्याविरूद्ध आपण आज पेटून उठलो आहोत यांचे कारण तो शोधतो तेव्हा काही वर्षापूर्वी आपण सावकाराला केलेली मदत व त्यानंतर आपली सुधारलेली परिस्थिती याचे चित्रण तो करतो. वीस वर्षापूर्वीचा दुष्काळ. एक मोठा जमीनदार अन्नाला महाग कसा झाला व आपण धान्य देऊन त्यातून त्यांला कसे तारले हे तो निवेदन करतो.

'भणंग भिकारी' या कथेतल्या आप्पानी केलेले पूर्वलक्षी निवेदन ही मनाला बरेच कांही सांगून जाते. सद्य परिस्थितीत आपण तापाने फणफणत असताना आपल्या मुलाने बोलावून ही डॉक्टर येत नाही. तो गावातील सर्वांच्या घरी जातो तेव्हा याचे कारण तो शोधतो. या ठिकाणी लेखकाने पूर्वलक्षी निवेदन केले आहे. ते अत्यंत प्रभावी आहे. आपण आजपर्यंत संपत्ती जोडली आणि माणसे तोडली याचा प्रत्यंत तिथे त्याला येतो. ग्रामीण भागात माणूस स्वार्थामुळे माणुसकीला विसरतो, स्वत:चे अस्तित्व तो ओळखू शकत नाही त्यामुळे संकटसमयी त्याला मदत करण्यास कुणीच पुढे येत नाही यांची जाणीव या कथेतून होते.

'मुका मार', 'तो मला हवा होता' या कथेतूनही पूर्वलक्षी निवेदनपद्धतीला जास्त प्राधान्य दिले गेले आहे.

## ✳ म. भा. भोसले यांच्या कथेतील मनोविश्लेषण :-

ग्रामीण कथा त्या व्यक्तीच्या भावना, त्याचे जीवन चित्रित करण्यात महत्त्वपूर्ण ठरली आहे. ग्रामीण माणसाचे मन चित्रित करणे ही ती कथा महत्त्वपूर्ण मानते. व्यक्तीच्या मनाचा वेध घेणे, काही प्रसंगी कथेतील पात्रही आपले स्वत:चे मन उलगडून दाखविणे याला प्राधान्य देते.

म. भा. भोसले यांची कथा ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर लिहिली गेली असल्याने अस्सल ग्रामीणत्व तिच्यात येते, व त्या कथेत व्यक्त होणारे मनही ग्रामीण जीवनाचा शोध घेते.

'मानवी मन' ही कथा एका पिळदार, अस्सल ग्रामीण माणसाच्या मनाची कहाणी आहे. शेतात राबणारा शेतकरी मनाने किती श्रीमंत असतो, तो माणुसकीला किती जपतो याचेच चित्रण ही कथा करते.

तात्या कुलकर्णी या बड्या गृहस्थाला 'नाही' हा शब्द उच्चारल्याने त्याच्या मनाला प्रश्न पडतो की आपण केले ते चूक की बरोबर कारण तात्या हे गावातले वजनदार शिवाय आज ते दौलतीचे मालकही होते कारण दौलती स्वत: त्यांच्या घरात आज राहात होता.

कथेत पुढे तर तात्या गाडीत बसायला नकार देतात तेव्हा त्याचे मन अधिकच बैचेन बनते. खाल्लेल्या सुपारीवर पान खायचे तो विसरूनच जातो आणि तात्यांच्या वागण्या बोलण्याचे त्याला कोडेच वाटू लागते.

'जिवंत पोरं' या कथेतल्या मारूतीचे मन रामूदाजींच्या लग्न समारंभाचे प्रभावी चित्रण करते. लग्नात चहा मिळाला नाही म्हणून पाणके रूसतात पण सावकाराच्या लग्न समारंभाची व रामूदाजींच्या लग्न समारंभाची मारूती तुलना करतो. रामूदाजी हे किती श्रेष्ठ, त्यांना साऱ्या गावाने किती नावाजले, त्यांचा स्वभाव या विषयी त्याचे मन विचार करू लागते -

''सगळ्या गावचे रामूदाजी, आपले रामूदाजी !गरीब, सालस नी सज्जन ! अशा माणसावर भर मांडवांत असा मानहानीचा प्रसंग यावा अन् तो आपण आणावा ? केवढा गाढवपणा हा !''[१७]

'भणंग भिकारी' या कथेतल्या आप्पांचीही हीच अवस्था झाली आहे. आपण तापाने फणफणत असताना आपल्या मुलाजवळ निरोप पाठवून ही डॉक्टर येत नाही तर पन्नास रूपये रोख आणि येण्यासाठी तो मोटार मागतो याचा त्यांना राग येतो. पण डॉक्टरच्या न येण्याचे ते कारण शोधू लागतात तेव्हा, - ''सारं गांव डॉक्टरला देवमाणूस म्हणून ओळखत होतं आप्पानाही त्याची प्रचिती आली होती. केरबा यादव आजारी असताना डॉक्टर त्याच्या छपरात न बोलविता आपण स्वत:हून गेले.''[१८] या विषयी त्यांचे मन विचार करू लागते.

'मुका मार' या कथेत एका शाळेच्या अस्पृश्य मास्तराच्या मनाची तगमग व्यक्त झाली आहे. दारिद्र्य हे अस्पृश्याच्या पाचवीला पुजलेले असताना ते नोकरी करून पोट भरणाऱ्याच्याही वाट्याला येते.

एका शिक्षकाने दिलेल्या जेवणातील काही पदार्थ आपण आपल्या मुलासाठी न्यावेत असे वाटूनही त्याला ते नेता येत नव्हते. त्यामुळे त्याच्या मनाची तगमग झाली होती.

'तुळसा', 'तो मला हवा होता' या सारख्या कथाही मनाचे प्रभावी चित्रण करतात कथेला अभिव्यक्तिच्या दृष्टीने सौंदर्य प्राप्त करून द्यायला मनोविश्लेषण हा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**✳ म. भा. भोसले यांच्या कथेतील भाषाशैली :-**

म. भा. भोसले यांच्या कथेची भाषाशैली त्यांच्या प्रकृतीप्रमाणेच साधी व अकृत्रिम आहे. त्यांची कथा निसर्ग वर्णनाला बऱ्याच प्रमाणात सामोरी गेली आहे. ग्रामीण मातीशी इमान राखून अस्सल गावरान भाषा वापरणे ते पसंत करतात. त्यांच्या कथा लेखनाचा अभ्यास करताना विशेषत: त्यांची भाषाशैली लक्षात घ्यावी लागते कारण त्यांच्या कथेचे बरेचसे यश भाषाशैलीत सामावले आहे.

लेखकाची स्वत:ची जी काही शैली असते त्याची ही जाणीव त्यांच्या कथेच्या बाबतीत होते. अस्सल ग्रामीण भाषेचे वळण त्यांची कथा स्वीकारते. ग्रामीण वातावरण निर्माण करण्यासाठी ते जे शब्द वापरतात तीच त्यांची भाषाशैली ठरते.

एखाद्या भावस्थितीचे वर्णन करताना भोसले त्या भावाशी एकरूप होतात. त्यामुळे कथा व लेखक यांच्यातील अंतर कमी होते. अशावेळी भाषा तपशीलवारपणे वापरली जाते.

'अहेव लेणं' ही कथा एका ग्रामीण वातावरणात चित्रित होत जाते. या कथेतला रामजी अशक्त आहे. तो आजारी आहे पण लेखकाने त्याच्या अंथरूणावरूनच सर्व व्यवहार टिपले आहेत. आजारीपण या एका घटकातून त्यांनी एका कुटुंबाच्या वेदना व दु:ख चित्रित केले आहे.

अंथरूणावर तळमळत पडलेल्या रामजीला आपण काही दिवसापूर्वी पत्नी सगुणाला दिलेल्या वचनाची आठवण होते. तो ज्यावेळी तरूण असतो त्यावेळी सगुणा त्याला साजाचं डोरलं मागते. पण रामजी आज, उद्या असे म्हणत ती गोष्ट पुढे ढकलतो पण आज आजारी पडल्यानंतर त्यांला आठवते तेव्हा आपली इच्छा पूरी करण्याचे तो ठरवितो. याबाबत सगुणा त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करते पण तो ऐकत नाही आणि आपल्या मुलाला दीड तोळयाचे साजाचे डोरले आणायला तो कोल्हापूरला पाठवितो.

''मुलाने आणलेलं डोरलं तो सगुणाला गळयात घालायला भाग पाडतो तेव्हा एकच क्षण रामजीचे ते निस्तेज डोळे समाधानानं चमकतात आणि दुसऱ्याच क्षणी ती चमक वातावरणात विलीन होते ! डोळे गारगोटीसारखे दिसू लागतात.''[११] (पृष्ठ ६९)

येथे ग्रामीण वातावरणाला साजेल अशी भाषाशैली म. भा. भोसले यांनी वापरली आहे. भोसले यांच्या कथेचे यश भाषाशैलीवरच आवलंबून आहे.

ग्रामीण सामाजिक जीवनाचे वास्तव चित्रण करणे हेही भोसले विचारपूर्वक स्वीकारतात. अस्पृश्य समाजाचे चित्रण करताना त्यातील तळमळ ते व्यक्त करतात. पिढ्यान पिढ्या ज्या अस्पृश्य समाजाला त्रास सहन करावा लागला त्या समाजाची व्यथा सांगणे हेही त्यांच्या भाषाशैलीचे एक अंग ठरते. 'गोकीचे गोकुळ' या कथेत ही अस्सल ग्रामीण भाषाशैली त्यांनी वापरली आहे.

म. भा. भोसले यांची भाषा मुळात सामान्य असणाऱ्या अनुभवाला असामान्य रूप प्राप्त करून देणारी आहे. आपल्या जीवनात येणाऱ्या अनुभवांना ते उत्कट रूप प्राप्त करुन देतात. त्यामुळे भोसले यांची कथा रंगतदार व ढंगदार बनली आहे. इतर ग्रामीण कथेपेक्षा तिची जीवनविषयक जाणीव अधिक प्रौढ आहे. भोसले यांच्या ग्रामीण भाषाशैलीत त्यांच्या लेखनात जीवनाच्या कटु वास्तवाचे ही चित्रण साकार झाले आहे. त्यामुळे मराठी ग्रामीण कथेत त्यांची कथा प्रभावी ठरली आहे.

✳ **निष्कर्ष :-**

१. म. भा. भोसले हे शेतकरी वर्गात स्वत: वावरत असल्याने शेतकरी, कामगार यांचे जीवन जवळून पाहून आपल्या कथेतून चित्रित केले त्यामुळे ती कथा आशयसमृद्ध बनली.

२. भोसले हे खेड्यातच जन्मले असल्याने व त्यांचा पिंड या भागातच घडल्याने या भागात वावरणाऱ्या माणसांचे चित्रण ते प्रभावीपणे करू शकले आणि शेतकरी वर्गाला न्याय देऊन त्यांचे ग्रामीण जीवन कथेतून रंगविले.

३. दारिद्र्य आणि अस्पृश्यता हे ग्रामीण माणसाच्या पाचवीला पुजलेले असतात. ग्रामीण भागात अस्पृश्यता किती बोकाळली आहे व त्यांच्या वाट्याला येणारे दारिद्र्य किती किळसवाणे आहे यांचे चित्रण आपल्या कथेतून अत्यंत प्रभावीपणे म. भा. भोसले यांनी केले आहे.

४. खेड्यात वावरणारा, त्या मातीशी इमान राखणारा शेतकरी मुक्या प्राण्यावर जिवापाड प्रेम करतो. इतर साहित्यापेक्षा ग्रामीण साहित्यात वेगळे दिसून येणारे हे वैशिष्ट्य महत्त्वपूर्ण ठरते.

५. दु:खाच्या असह्य वेदना सहन करण्याची ताकद ग्रामीण माणसाच्या ठिकाणी जास्त स्वरुपात असते. संसारात काबाडकष्ट करून दु:खालाही सामोरे जाऊन हा खेड्यातील माणूस जीवन जगत असतो. याचीही जाणीव ग्रामीण कथेतून होते.

६. बलुतेदार हा शेतकऱ्याशी संबंधित असणारा एक घटक असतो. शेतकऱ्याच्या उदार मनाबरोबर तोही प्रामाणिक व वचनाला जागणारा व प्रसंगी शेतकऱ्याला मदत करणारा असतो. याचे प्रभावी चित्रण भोसले यांच्या कथेतून आले आहे.

७. अंधश्रद्धा ही ग्रामीण समाजाला जास्तीत जास्त प्रमाणात लागलेली कीड आहे. खेड्यातला माणूस जास्त प्रमाणात अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला असतो. त्यातून या ग्रामीण माणसांची मुक्तता व्हावी म्हणून ग्रामीण कथेतून त्यांचे बऱ्याच प्रमाणात चित्रण झालेले आढळते. भोसले यांची कथा या गोष्टीला सामोरी गेली आहे.

८. ग्रामीण समाजात माणुसकी कशा प्रकारे जपली जाते, तो माणूस माणसाठी बरेच काही करायला तयार होतो. माणुसकीपोटी तो स्वत:चा हक्क सोडायला तयार होतो, दुसऱ्याला संकटातून वाचवतो या गोष्टी बऱ्याच प्रमाणात भोसले यांच्या ग्रामीण कथेतून चित्रित झाल्या आहेत.

९. साहित्यातून निसर्गाला बरेच स्थान दिले गेले आहे तर ग्रामीण कथा रंगतदार बनविणे हेही निसर्ग आपली भूमिका बजावतो. म्हणून निसर्गाला आपल्या कथेत योग्य स्थान म. भा. भोसले यांनी दिले आहे.

१०. ग्रामीण कथा यशस्वी व्हायला, साहित्यात तिचे स्वतंत्र स्थान निर्माण व्हायला कथानक महत्त्वपूर्ण ठरते. स्वत:ला जीवनात आलेल्या प्रत्यक्ष अनुभवातून भोसले यांनी कथानक निवडले आणि कथा लिहिली हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरते.

११. ग्रामीण परिसरातील प्रसंग, घटना चित्रित व्हायला आणि ती वाचकांच्या मनावर परिणाम करण्यासाठी वातावरण निर्मिती ही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे त्या घटनेला अथवा प्रसंगाला वजन राहाते. भोसले यांनी आपल्या कथेतून प्रभावी अशी वातावरण निर्मिती करून ती कथा यशस्वी बनविली आहे.

१२. खेड्यात राहणाऱ्या माणसांचा स्वभाव, त्यांचे मन, त्यांचे व्यक्तिमत्त्व समजून यायचे असेल तर संवादाला महत्त्व असते. ग्रामीण कथेत येणारा संवाद त्या पात्रांची बरीच ओळख करून देतो. भोसले यांच्या ग्रामीण कथेतील संवाद जीवनातला एक नवीनच आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवतात.

१३. एखाद्या विषयाची सरळ मांडणी करण्याचे काम निवेदन करत असते. एखादे पात्र निवेदन करते त्यावेळी वाचकांना बऱ्याच गोष्टी ज्ञात होतात. भोसले यांनी वापरलेली निवेदनपद्धती व पूर्वलक्षी निवेदन हे त्यांच्या कथेला यश मिळवून देणारे ठरले आहे. व त्या निवेदनाची भाषा सुंदर व रसाळ असल्याने कथेला रंगतदारपणा आला आहे.

१४. ग्रामीण कथेत मनाच्या प्रवृत्तीला महत्त्वपूर्ण स्थान आहे. इतर कथाकारांच्या प्रमाणे भोसले यांनी ती भूमिका पार पाडली आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनाचा शोध घेणे हे भोसले यांनी तत्त्व स्वीकारले आहे.

१५. कोणत्याही साहित्याचे चित्रण होत असताना भाषाशैली महत्त्वपूर्ण ठरत असते. भोसले यांच्या कथेत येणारी भाषा अस्सल ग्रामीण आहे. त्यामुळे ग्रामीण वाङ्मयाशी ती पूर्णपणे एकरुप झाली आहे असे म्हणता येईल.

## तळटीपा

१. भोसले म. भा. -'ग्रामीण कथा' (कथासंग्रह) कथा-'महापूर', पृष्ठ. १२

२. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'माझी ताई', पृष्ठ. ७६

३. भोसले म. भा. -'ग्रामीण कथा'(कथासंग्रह) कथा- 'नवा करार', पृष्ठ. १६१

४. भोसले म. भा. - 'ग्रामीण कथा' (कथासंग्रह) कथा - 'नांदाय जाते', पृष्ठ. १३०

५. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'मानवी मन', पृष्ठ. १०९

६. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'जिवंत पोरं', पृष्ठ. ४१

७. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'नवी पिढी', पृष्ठ. ९४

८. भोसले म. भा. - 'ग्रामीण कथा' (कथासंग्रह) कथा - 'खिल्लारी जोडी', पृष्ठ. १८

९. भोसले म. भा. - 'ग्रामीण कथा' (कथासंग्रह) कथा - 'खिल्लारी जोडी', पृष्ठ. २१

१०. भोसले म. भा. -'ग्रामीण कथा' (कथासंग्रह) कथा- 'महापूर', पृष्ठ. १०

११. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'मानवी मन', पृष्ठ. १०९

१२. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'मानवी मन', पृष्ठ. १०९

१३. भोसले म. भा. -'ग्रामीण कथा' (कथासंग्रह) कथा- 'सखा गालात हसला', पृष्ठ. १२०

१४. भोसले म. भा. - 'ग्रामीण कथा'(कथासंग्रह) कथा - 'नांदाय जाते', पृष्ठ. १४०

१५. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'माझी ताई', पृष्ठ. ७५

१६. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'अहेव लेणं', पृष्ठ. ६४

१७. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'जिवंत पोरं', पृष्ठ. ४१

१८. भोसले म. भा. - 'ग्रामीण कथा' (कथासंग्रह) कथा - 'भणंग भिकारी', पृष्ठ. ९०

१९. भोसले म. भा. - 'अहेव लेणं' (कथासंग्रह) कथा- 'अहेव लेणं', पृष्ठ. ६९

****